जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुवि ६६३५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दि. :- 21 JUN 1996

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- प्रथम मान्यता.
राजा शिवराय प्रतिष्ठान माध्यमिक विद्यालय, पौडरोड, पु

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९४-९५/दिनांक २३.७.९५

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३, अन्वये राजा शिवराय प्रतिष्ठान, कोथरुड. संस्थेच्या राजा शिवराय प्रतिष्ठान माध्यमिक विद्यालय, पौडरोड, पुणे. माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /xxxxxxx च्या वर्गास सन १९९४ - १९९५ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९४ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावर प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलबध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलबध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.

१० ] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११ ] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२ ] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३ ] पुरेशी विद्यार्थी संख्या वाढवावी.
१४ ]
१५ ]

[illegible]तावर शि. उ. सं. यांची
सही असे


शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक,
राजा शिवराय प्रतिष्ठान माध्यमिक
विद्यालय, पौड रोड, पुणे.

"यशवंतराव चव्हाण भवन"
, जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/
पुणे, दि. १८८५.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका BOOK POST



राजा शिवराय प्रति. माध्यमिक विद्यालय, कोथरुड. पौड रोड, पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

. सन १९९५-९६, इ. ६ वी, ७वी, ९वी, १०वी.

आपल्या राजा शिवराय प्रतिष्ठान, कोथरुड द्वारा संचालित माध्यमिक विद्या. कोथरुड ह्या माध्यमिक शाळेतील इ. ८वी/ ५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य ३(७८)जमाशा/मान्यता/प्रवि/९४ दि. १७०७९४ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, ७ वी, ९ वी, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९६
पुणे, दि. ८/७/९६.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

राजा शिवराय माध्य. विद्यालय, कोथरुड.
पुणे २९.

**विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.**

सन १९९६-९७, इ. ८ वी, ९वी, १०वी.

आपल्या राजा शिवराय प्रतिष्ठान, कोथरुड द्वारा संचालित राजा शिवराय माध्य. विद्या. कोथरुड. ह्या माध्यमिक शाळेतील इ. ८वी/९वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/(नवीनशाळा)/मान्यता/पुणे/९४ दि. १९/७/९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ८ वी, ९ वी, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देण्यात येत आहे. तरी आपण सदर वर्गाची ---- वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

TRUE COPY

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे. शिक्षण माध्यमिक.
शिक्षण/माध्य/ह-४/प्रथम मान्यता/९६-९७
पुणे, दि. १३/२/९७

प्रति, **BOOK-POST**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
शिवराय प्रतिष्ठान माध्यमिक विद्यालय कोथरूड
पुणे २९

विषय :- इ. १०वी वर्गास प्रथम मान्यता. ९६-९७

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कडील पत्र क्र. माध्य / प्रथम मान्यता /पुणे/ ९६
दि.

उपरोक्त विषयांकित अन्वये आपल्या शिवराय प्रतिष्ठान संस्थेद्वारा संचालित मराठी/ ~~इंग्रजी~~ माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करून द्यावे.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून ग्रंथांची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] शैक्षणिक, कार्यानुभव व क्रीडा साहित्य उपलब्ध करून द्यावे.
८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर व्हावा.
९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.
१०] शालेय फीचे दर मा. शि. संचालक, म. रा. पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावे.
११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
१२] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
१३] शिक्षणाचा दर्जा निश्चित राखण्याची काळजी घ्यावी.
१४] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करून घेण्यात यावी.
१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता

received on 9/7/97

TRUE COPY

आवक — ... 27/04/200...

(110)

दुरध्वनी क्रं. ६०५०७३३.

" यशंवतराव चव्हाण भवन "
पुणे जिल्हा परिषद पुणे.

जा.क्रं. शिक्षण. माध्य. ह. १२. तुकडया सन २००.०१.
२४१. २६५. ००. ०१ दिनांक १३. ३. २०००.०१.
६३१. ७५४.

27 APR 2001

प्रती,
मुख्याध्यापक : मुख्याध्यापिका
राजा श्री शिवराय प्रतिष्ठान माध्य. विद्या. ...
ता. -------- जि. पुणे पुणे शहर पिन नं. ४११०३८

विषय :– अशासकिय अनुदानित माध्यमिक शाळांना नविन अनुदान सुत्रानुसार जादा तुकडयां मंजुर करणे बाबत.

संदर्भ :– १] मा. शासन पत्र क्रं. माजातु. ३०००. ३०३. २००० माशि १ दिनांक १४. ७. ००

२] मा. शासन निर्णय क्रं. माजातु. १०००. ५१६. २००० माशि १ दिनांक १०. २. २००१.

३] मा. शिक्षण संचालक म. रा. पुणे यांचे कडील पत्र क्रं. अमाशा. १२२. कें. जातु. २०००. ०१ १५ क दिनांक २६. २. २००१.

४] मा शिक्षण संचालक पुणे महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडील समक्रमांक व दिनांक १. ३. २००० चे पत्र.

५] मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कडील पत्र जा. क्रं. माध्य. ३. १३. तुकडया पुवि. २००१ दिनांक ९. ३. २००१.

उपरोक्त विषयांचे संदर्भीय पत्रान्वये शासनाचे उपरोक्त विषयांचे संदर्भ क्रं. १ चे पत्रानुसार सन २०००. ०१ या शैक्षणिक वर्षापासुन अशासकिय अनुदानित [माध्यमिक शाळांमध्ये अतिरिक्त तुकडया मंजुर करण्यांची नवीन अनुदान सूत्राप्रमाणे विहित कार्यपध्दती जाहिर केली आहे. [ सोबत संबधित आदेशांची प्रत ].

शासन निर्णय दिनांक १४. ७. २००० मधील आणि त्याशिवाय खालील अटी–च्यां आधीन राहुन शैक्षणिक वर्षे २०००–०१ करिता विना अनुदान तत्वावर आपल्या प्रशालेस जादा नैसर्गीक वाढीने तुकडया मंजुर करण्यांत येत आहे.

माध्यमिक शाळांचे नाव :– राजा श्री शिवराय प्रतिष्ठान माध्य. विद्या. ...

| अ. क्रं. | मेरीट क्रमांक | इयत्ता | मान्य तुकडी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १] | ३ | ८वी | २ री (दुसरी) | जादा/नैसर्गीक |
| २] | ९ | ९वी | २ री (दुसरी) | जादा/ नैसर्गीक |
| ३] | १३ | ८वी | ३री (तिसरी) | जादा/ नैसर्गीक |
| ४] | ४ | १०वी | २री (दुसरी) | जादा/ नैसर्गीक |
| ५] | ३३ | ८वी | ३री (तिसरी) | जादा/ नैसर्गीक |
| ६] | | | | जादा/ नैसर्गीक |

" अटी व शर्ती "
==============

१] जुलै / ऑगस्ट २००० मधील पट पडताळणी नंतर मान्य केलेल्या अटीवर वरील तुकडी मंजुर केलेली आहे...

२] मान्य पटापेक्षा कमी पट असल्यांस / आढळल्यांस सदर तुकडी नादेय राहिल.

३] तुकडी मंजुर झाल्यानंतरही ती शाळेने सुरु केलेली नाही. असे निदर्शनांस आल्यांस सदरची तुकडी आपोआपच रद्द होईल.

४] सदर तुकडीचा आदेश प्राप्त होताच तुकडी / तुकड्या मंजुर असल्यांचा अहवाल मुख्याधापकाने या कार्यालयांकडे पाठवावा अन्यथा सदर तुकडी चालु नाही. असे गृहित धरुन ती पुढील अनुदानासाठी ग्राह्य धरली जाणार नाही.

५] सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता विषयक प्रस्ताव आदेश मिळाल्यापासुन १० दिवसांचे आत या कार्यालयां-च्या शिबिरामध्ये दाखल करणे शाळेवर बंधनकारक राहील.

६] पुढील शैक्षणिक वर्षी सदर मंजुर तुकडी अगर जादा/ नैसर्गिक वाढीने चालु राहणा या सदर वर्गाच्या तुकडीत निकषापेक्षा पट कमी झाल्यांस ती तुकडी बंद झाल्याचे तात्काळ या कार्यालयांस लेखी स्वरुपात कळवावे.

७] विना अनुदानित वरील तुकडी पुरेशी पटसंख्या असल्यांस पाचव्या वर्षी २० % सहाव्या वर्षी ४० %, सातव्या वर्षी ६० %, आठव्या वर्षी ८० %, या प्रमाणे नवव्या वर्षी १०० % अनुदानावर राहिल.

" स्थळ प्रतीवर मा. शि. अ. यांची सही असे.

शिक्षणाधिकारी [ माध्य. ]
पुणे जिल्हा परिषद पुणे [करिता].

प्रत :- यांना माहितीसाठी सविनय सादर,

मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे.

प्रत :-
श्री/ श्रीम. जाधव, लोंढे, जोशी, हेच कार्यालय.
[ व.स. ]

२/- सोबत यादी जोडलेली आहे.

आवक → २९/२००४-०५ १८/११/०४

यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे.
[ शिक्षण माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ई-३/०४-०५

दिनांक : २९ -१०-२००४.

BOOK-POST

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

राजा श्री शिवराय प्रतिष्ठान
माध्यमिक विद्यालय
कोथरुड पुणे ३८

विषय :- मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत......

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा.शा.अ-२००३/[३८०/२००३] मा. शि.-१ दिनांक १३ ऑगस्ट २००४.

२] मा. शिक्षण संचालक [ माध्य. व उच्च माध्यमिक ] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा २००४/ /२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ०८.०९.२००४ चे पत्र

~~३] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक दिनांक चे पत्र~~

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन २००१ -०२ २००२-०३ व २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यास आलेली दप्तर तपासणी व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकड्या त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यास येत आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा / नैसर्गिक वाढीव | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | ८वी | ४ थी | २००३/०४ | जादाप्रवेश | कायमविनाअनुदानित |
| २. | १०वी | ३री | २००२/०३ | नैसर्गिक वाढ | विनाअनुदानित |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |

उपरोक्त तुकडया पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्र किंवा जेव्हा त्या तुकडया अनुदानास पात्र ठरतील अनुदानावर आणल्या जातील त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकडयांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकडयांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अतिरिक्त तुकडया या केवळ कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकडया अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

४] कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकडया कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यास आल्या आहेत अशा तुकडया देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकडयानुसार सेवकसंच मान्य करुन घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करुन दयावी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.